म वि नि आ

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.

**दूरध्वनी :** ०२२ – २२१६ ३९६४ / ६५ **फॅक्स :** ०२२–२२१६ ३९७६

**ई–मेल :** mercindia@merc.gov.in **संकेतस्थळ :** www.mercindia.org.in / www.merc.gov.in

जाहिरात क्र. ०४/२०१६–१७

## जाहीर सूचना

### टाटा पॉवर कंपनी लिमिटेडच्या विद्युत जाळे उभारणीच्या आराखड्यावर आणि समितीने सादर केलेल्या अहवालावर अभिप्राय मागविण्याबाबत.

१. आयोगाने सन २०१४ च्या प्रकरण क्र. ९० मध्ये दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजी दिलेल्या आदेशात टाटा पॉवर कंपनी लिमिटेडला (टीपीसी–वितरण) १६ ऑगस्ट, २०१४ पासून २५ वर्षांसाठी वितरण परवाना मंजूर केला होता आणि टीपीसी–वितरणला विद्युत जाळे उभारणीचा सुधारित आराखडा मान्यतेसाठी स्वतंत्रपणे सादर करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार, टीपीसी–वितरणने त्यांच्या विद्युत जाळे उभारणीच्या सुधारित आराखड्यास मान्यतेसाठी सन २०१४ च्या प्रकरण क्र. १८२ ने याचिका दाखल केली आहे. ही याचिका प्रलंबित असताना, विद्युत अपीलिय न्यायाधिकरणाने दिनांक २८.११.२०१४ च्या निकालाद्वारे, विद्युत जाळ्याची उभारणी आणि त्याच्या संयुक्त वापरासंबंधात काही निष्कर्ष, निरीक्षणे आणि निदेश देऊन, सन २०१२ चे अपील क्र. २२९ आणि २४६ निकाली काढले.

२. विद्युत अपील न्यायाधिकरणाचा दिनांक २८.११.२०१४ रोजीचा निकाल विचारात घेऊन, आयोगाने सन २०१४ च्या प्रकरण क्र. १८२ मध्ये दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ च्या अंतरिम आदेशाने, इतर बाबींबरोबरच, काही मुद्यांवर शिफारशी करण्यासाठी समिती गठीत केली. आयोगाने आपल्या अंतरिम आदेशात नमूद केले की, समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर, जनतेचे अभिप्राय मागविण्यात येतील आणि टीपीसी–वितरणचा विद्युत जाळे उभारणीचा आराखडा आणि समितीच्या अहवालावर जाहीर सुनावणी घेण्यात येईल.

३. आयोगास समितीचा अहवाल दिनांक २९ मार्च, २०१६ रोजी प्राप्त झाला. हा अहवाल या प्रकरणातील पक्षकारांना (बेस्ट उपक्रम, टीपीसी–वितरण, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.) आणि प्राधिकृत संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधींना त्यांच्या अभिप्रायासाठी प्रसृत करण्यात आला आहे.

४. सन २०१४ च्या प्रकरण क्र. १८२ मध्ये पक्षकार आणि इतरांनी सादर केलेली सर्व निवेदने, विद्युत अपील न्यायाधिकरणाचा दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ चा निकाल, आयोगाचा दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ चा अंतरिम आदेश, समितीचा अहवाल आणि अहवालावर प्राप्त झालेले अभिप्राय आयोगाच्या **www.mercindia.org.in/ www.merc.gov.in** या संकेत–स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध करण्यात आले आहेत.

५. आयोग आता टीपीसी–वितरणने प्रस्तावित केलेला विद्युत जाळे उभारणीचा आराखडा आणि समितीने सादर केलेला अहवाल यावर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित आहे. या अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती, इंग्रजी किंवा मराठीमध्ये, सहा (१+५) प्रतींमध्ये, **आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५, येथे व्यक्तिश: किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई–मेल (फॅक्स:०२२–२२१६३९७६, ई–मेल: mercindia@merc.gov.in**) द्वारा **दि. १० जून, २०१६** पर्यंत कृपया पाठविण्यात याव्यात आणि त्यात पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई–मेलचा पत्ता, असल्यास, देण्यात यावा. जर कोणत्याही संस्था किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने सूचना/हरकती पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. पाठविणाऱ्या व्यक्तीला आपले म्हणणे व्यक्तीश: मांडावयाचे असेल तर तसे देखील त्यामध्ये नमूद करावे, म्हणजे सदर व्यक्तीला, **पहिला मजला, सेंट्रम हॉल, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई–४०० ००५ येथे, मंगळवार, दिनांक २१ जून, २०१६ रोजी, सकाळी ११.०० वाजता** होणाऱ्या जाहीर सुनावणीमध्ये, त्याचे म्हणणे मांडण्याची संधी आयोगाकडून देण्यात येईल, त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

दिनांक : २० मे, २०१६

ठिकाण : मुंबई

सचिव

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**Size : 12 (W) x 19 (H) :: TATA POWER (M)**